# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **शहरातील नागरिकांना डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य देत मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या हस्ते वॉटर टँकर ॲप्लिकेशन या संकेतस्थळाचे लोकार्पण**
- **शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी पाणीपट्टी कर घरोघरी वसुली करण्याकरिता POS मशीनचे लोकार्पण**

दिनांक २८ नोव्हेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते ऑनलाईन वॉटर टँकर ॲप्लिकेशन या संकेतस्थळाचे व पाणीपट्टी कर घरोघरी वसुली करण्याकरिता POS मशीनचे लोकार्पण करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वी महापालिकेच्या कामकाजास डिजिटल करण्या साठी विविध प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत. यामध्ये ई-ऑफिस, कमर्शियल वेबसाईट व इतर सुविधा या ऑनलाईन पद्धतीने देण्यात येत आहे. मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना पाण्याच्या टँकरची सुविधा उपलब्ध करून घेण्याकरिता महानगरपालिका मुख्य कार्यालयात किंवा प्रभाग कार्यालयात जाऊन त्याकरिता अर्ज करण्यासाठी नेहमी भेट द्यावी लागत असल्या कारणाने मा. आयुक्त यांच्या संकल्पनेतून ऑनलाईन वॉटर टँकर ॲप्लिकेशन संकेतस्थळ विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. यामध्ये नागरिकांना घरी बसल्या वॉटर टँकरसाठी अर्ज करणे शक्य होणार आहे. तसेच त्याच संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना ऑनलाइन पेमेंट सुविधा वापरून टँकर बुक करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पाणीपट्टी कर भरणा करण्याकरिता नागरिकांना महापालिका मुख्य कार्यालयात किंवा नजीकच्या पाणीपट्टी कर भरणा केंद्रावर भेट देऊन कर भरणा करावा लागतो. शहरातील बहुतांश नागरिक हे नोकरदार वर्गाचे असल्याने त्यांना पाणीपट्टी कर भरणा करण्याकरिता केंद्रास भेट देणे शक्य होत नाही. यासाठी नागरिकांकरीता कॅशलेस सुविधा म्हणून त्यांच्या सोयीसाठी पाणीपट्टी कर घरोघरी वसुली करण्याकरिता POS मशीनचे लोकार्पण मा. आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले आहे. आपल्या अधिकृत बँक खात्याचे डेबिट कार्ड वापरून नागरिकांना या मशीनद्वारे पाणीपट्टी कर भरणा करण्यास मदत होणार आहे. तसेच या मशीनच्या माध्यमातून ऑनलाइन पेमेंट जसे की गुगल पे, फोन पे, पेटीएम या UPI ॲपद्वारे पाणीपट्टी कर भरणा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शहरातील नागरिकांसाठी भविष्यात या प्रकारच्या डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्याकरिता महापालिका नेहमी कटिबद्ध राहील असे प्रतिपादन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी केले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मालमत्ता कर/पाणीपट्टी कर भरणा करण्याकरिता तसेच इतर सुविधांची माहिती मिळवण्याकरिता प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअर वर भेट देऊन MyMBMC हे ॲप डाऊनलोड करावे किंवा mbmc.gov.in व mymbmc.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. शहरातील नागरिकांनी या डिजिटल सेवा सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. आयुक्त यांच्या वतीने करण्यात येत आहे.